## दृष्टिक्षेपात तालुका

| | | | |
|---|---|---|---|
| • क्षेत्रफळ (चौ.किमी) | १९७१४.४२ | • महसूल मंडळे | ६ |
| • गावांची संख्या | ६८ | • जि.प.सर्कल | ६ |
| • ग्रामपंचायती | ६८ | • प्रा. आरोग्य केंद्रे | ८ |
| • नगरपरिषद | १ | • शाळांची संख्या | १७२ |
| • पोलीस ठाणी | १ | • महाविद्यालये | ६ |

## श्री गणेश मंदीर तासगाव

महाराष्ट्रात ऐतिहासिक, सांस्कृतिक, राजकीय, सामाजिक अशा विविध अंगांनी तासगाव तालुका नेहमी चर्चेत राहिला आहे. मराठा साम्राज्याचे सरसेनापती परशुरामभाऊ पटवर्धन (तासगावकर) यांचे तासगांव हे संस्थान. दाक्षिणात्य पद्धतीचे उंच असे गणपतीचे गोपूर आणि अलोट उत्साहात साजरा होणारा रथोत्सव प्रसिद्ध आहे. श्रीमंत परशुरामभाऊ रामचंद्र पटवर्धन (जन्म १७४०, निर्वाण १७९९) हे मराठा साम्राज्याचे सरसेनापती

## आरफळ योजना तासगाव

१९६६ मध्ये कृष्णा प्रकल्पास नियोजन आयोगाची मान्यता मिळाली. कृष्णा खोऱ्यात या प्रकल्पाच्या कामास सुरूवात होऊन या प्रकल्पांतर्गत सातारा जिल्ह्यात धोम व कण्हेर अशी दोन धरणे बांधण्यात आली. पैकी कण्हेर या धरणातून सातारा आणि सांगली जिल्ह्याला पाणी देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या कालव्यालाच आरफळ कालवा असे नाव देण्यात आले. २०४ किमी लांबीच्या कालव्याचे काम १९९७ मध्ये ८५ किमी पर्यंतच झाले. नवीन प्रस्तावास १९९७ मध्ये मंजुरी मिळाल्यानंतर पुढील १०२ किमी अंतरासाठी च्या मार्गासाठी शिवणी येथे १७ किमीचा बोगदा खोदण्यात आला. जून २००२ मध्ये १०७ कोटी रु. खर्चून बोगद्याचे काम पूर्ण करुन पाणी थेट येरळा नदीत सोडण्यात आले. जून २००२ नंतर 'आरफळ कालवा' तासगाव तालुक्यात आणण्याचे काम सुरू झाले. त्यानंतर येरळा मोळी जलसेतू बांधण्याचा टप्पा पार पडला. आळसंदमार्गे तासगाव तालुक्यातील चिखलगोठणपर्यंत १३० कि.मी. पर्यंत चा कालवा पूर्ण झाला. तब्बल ४०० कोटी रुपये या कामासाठी उपलब्ध झाले.

Scanned by CamScanner

निंबळकपासून कुमठे गावापर्यंतच्या २५ गावाच्या शिवारात पाणी येऊ लागले. सुमारे ६०% क्षेत्र या पाण्याने भिजत आहे. शेतकऱ्यांच्या जीवनात क्रांती उदयाला आली आहे. सुमारे ४० एकर परिसराला या योजनेचा लाभ झाला आहे.

## बेदाणा मार्केट तासगाव

तासगाव कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना २७ जानेवारी १९४८ रोजी झाली. सुरवातीस तासगाव बाजारपेठ ही शेंग, गुळ व हळद या शेतमालासाठी प्रसिद्ध होती. कालांतराने शेंग व गुळाचे पीक कमी झाल्याने सर्व भुसार धान्य (कडधान्ये), चिंच यासाठी तासगाव बाजारपेठ प्रसिध्दीस आली. आजही चिंच व भुसार मालासाठी प्रसिद्ध आहे.

तासगाव तालुक्यात १९७० पासून द्राक्ष लागणीस सुरूवात झाली. १९९० पासून द्राक्षावर प्रक्रिया करुन त्यापासून बेदाणा तयार होऊ लागला. लोकप्रतिनिधी आर.आर. (आबा) पाटील यांनी १३ मार्च १९९४ रोजी भारतातील पहिले बेदाणा मार्केट कृषी उत्पन्न बाजार समिती तासगाव येथे सुरू केले. १९९४-९५ मध्ये प्रतिकिलो दर रुपये ३५ ते ९५ पर्यंत होते २००१ - २००२ मध्ये प्रतिकिलो दर रु ५५. ते १४० होते. २०१०-२०११ मध्ये प्रतिकिलो रु. ८० ते १६७ पर्यंत ही वाढ बाजारातील लिलाव पद्धतीने झाली. बेदाण्याचे वाढते उत्पन्न लक्षात घेऊन सध्या २५ कोल्डस्टोअरेज कार्यरत असून द्राक्ष उत्पादक व बेदाणा उत्पादक शेतकऱ्यांचा माल या शीतगृहात सुरक्षित ठेवला जातो. मालाचे दर पडले की माल कमी किंमतीस विकावा लागतो त्यास आधार म्हणून त्यावेळचे महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ पुणेचे अध्यक्ष तथा पणनमंत्री हर्षवर्धन पाटील (भाऊ) यांनी शेतमाल तारण कर्ज योजना राबवून कर्जवाटप केले.

बाजार समितीने सध्या बाजार आवारात स्वनिधीतून चांगले रस्ते, गटारी, दिवाबत्तीची व्यवस्था केली.

## कवठेएकंदची आतषबाजी

कवठेएकंदचे आराध्य दैवत सिद्धराज आहे. हे मंदिर भुईकोट किल्ल्यासारखे आहे. या मंदिराचे कळस सोन्याचे असल्यामुळे ते लक्षवेधी ठरते. कवठेएकंद हे गाव दरवर्षी विजयादशमीला भरणाऱ्या सप्तरंगी आतषबाजीसाठी प्रसिद्ध आहे.

विजयादशमी दिवशी ही आतषबाजी पाहण्यासाठी लोकांची प्रचंड गर्दी असते. यामध्ये स्वागत कमान, सुरूची झाडे, भुसनळे, पांढऱ्या रंगाच्या ठिपक्यांचा झोत, धबधबे, दांडपट्टा, अग्निबाण, शिंगर, मुलुखमैदान तोफ, फुगडी तोफ, मोर, चक्र, व आऊट यांचा समावेश असतो.

Scanned by CamScanner

## श्री राधा-गोपाल मंदिर, आरवडे

द्राक्ष्यांसाठी जागतिक बाजारपेठेत नाव कमावलेल्या तासगाव तालुक्यास एक ऐतिहासिक परंपरा लाभली आहे. तासगाव पासून पूर्वेस अकरा किमी अंतरावर असणाऱ्या आरवडे या गावाने सुद्धा तालुक्याच्या ऐतिहासिक परंपरेत भर टाकली आहे. आंतरराष्ट्रीय श्रीकृष्णभावनामृत संस्था म्हणजेच इस्कॉनचे सध्याचे प्रमुख परमपूज्य लोकनाथ स्वामीजी महाराज यांची जन्मभूमी असल्याने सध्या जगाच्या नकाशात आरवडे या गावाने आपले स्थान निर्माण केले आहे. पूर्वी वासुदेवाचे गाव म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या या गावाने आता हरेकृष्ण नगरी म्हणून नवी ओळख जगाला करून दिली. या गावामध्ये श्री राधा गोपाल मंदीर हे भगवत्‌गीतेचे आध्यात्मिक केंद्र, बालसंस्काराचे संकुल म्हणून पर्यटकांचे आकर्षण ठरले आहे.

ग्लोबलायझेशनच्या जगामध्ये भारतीय परंपरा आणि ग्रामीण संस्कृती यामुळे आरवडेकडे इस्कॉन भक्तांचा ओढा आहे. आठ कोटी रुपये खर्च करुन साकारलेल्या श्री राधा गोपाल मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे दक्षिणात्य व उत्तर भारतीय नक्षीकामाचा उत्कृष्ट नमुना आहे. सुमारे सहा एकर परिसर मंदिराने व्यापला असून त्यामध्ये आकर्षक स्वागत कमान, मुख्य मंदिराचा गाभारा, श्रीकृष्ण तत्व दर्शन, गोशाळा, गोवर्धन, पर्वतांची प्रतिकृती, श्रीकृष्ण व राधाची मनमोहक मूर्ती, तसेच आध्यात्मिक प्रसंगाच्या विविध शिल्प कलांचे नमुने भक्तांसाठी प्रेरणा देणारे ठरतात. मंदिराचे खास वैशिष्ट्य म्हणजे मंदिरास ८४ खांब व तीन प्रमुख शिखरांसह तेरा शिखरे आहेत. अशी ८४ खांब असलेली मंदिरे जगामध्ये केवळ दोनच आहेत. राधा कृष्णाचे मुख्य मंदिर, शंकर, हनुमान, श्रीराम, विठ्ठल, तुकाराम, नरसिंह यांची मंदिरे, राजस्थानी शिल्पकलेचा नमुना, उत्तर प्रदेशच्या मूर्तिकला असे विविध पैलू आहेत. भगवद्‌गीतेच्या वचनाप्रमाणे हरे कृष्ण हरे राम, राम राम हरे हरे च्या भक्तिमय वातावरणामध्ये हे मंदिर म्हणजे एक आध्यात्मिक केंद्रच आहे.

## तासगाव तालुका

- तासगाव येथील गोपूर, गणेश मंदिर
- अंकलखोपजवळ क्षीक्षेत्र औदुंबर व दत्तमंदिर
- पलूस येथील श्री धोंडी महाराज समाधी
- ब्रम्हनाळ येथील कृष्णा व येरळा संगम व राजयोगी आनंदमूर्ती समाधी
- भिलवडीजवळ (भुवनेश्वरवाडी) येथील भुवनेश्वरी देवीचे अतिप्राचीन मंदिर
- कवठेएकंद येथे अतिप्राचीन श्री सिद्धराज देवालय, जेथे विजयादशमी दिवशी शोभेच्या दारुकामाची आतषबाजी केली जाते.

Scanned by CamScanner